## फिर्यादीची शपथेवर पडताळणी

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेते की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

माझे नावः मंगल गुलाब वाघ,
वयः ४६ वर्षे, धंदाः शेती,
राः पहाडदरा धामणी, ता. आंबेगाव, जि. पुणे.

दि.१७/१२/२०२४ रोजी राणुबाई बचत गटाची मिटिंग करिश्मा बबन वाघ यांच्या घरासमोर चालु होती. सचिव राजश्री अनिल वाघ यांच्याकडे मी बचत गटाच्या हिशोबाची विचारणा केली असता त्यांनी मला गलिच्छ भाषेत शिवीगाळ केली. त्यानंतर राजश्री वाघ यांनी योगेंद्र अनिल वाघ यांना बोलावुन घेतले. त्यांनी कोणताही विचार न करता मला गलिच्छ भाषेत शिवीगाळ केली व अनिल शंकर वाघ, देवेंद्र दिलीप वाघ, अतिष शंकर वाघ यांना बोलावुन घेतले.

२. त्यानंतर त्या सर्वांनी मला खाली पाडले, माझे कपडे फाडले. माझ्यासोबत अश्लिल वर्तन करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी इतर महिलांनी माझी सोडवणुक केली. त्यानंतर सर्वांनी " मला तुला कुठे जायचे तिथे जा. तुझ कोणी ऐकणार नाही. तुझी तक्रार कोणी घेणार नाही " अशी धमकी दिली.

३. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला गेले. तेथे माझ्या आधी आरोपी हजर होते. पोलीसांनी माझ्या एफ.आय.आर. नोंदवून घेतला नाही. पोलीसांनी एन.सी.आर. नोंदविला. पोलीसांनी एन.सी.आर. मध्ये सर्व आरोपींची नावे घेतली नाहीत. फक्त दोघांचीच नावे घेतली.

४. माझे पती अपंग आहेत. सदर प्रकारामुळे माझा मुलगा गतीमंद झाला आहे.

त्यानंतर मी पोलीस उपाधिक्षक खेड यांच्याकडे गेले. त्यांनी पारगाव पोलीस स्टेशनला पत्र दिले. परंतु पोलीसांनी कोणतीही कारवाई केली नाही. सदर आरोपींना शिक्षा व्हावी ही विनंती.

( मंगल गुलाब वाघ )
फिर्यादी

समक्ष

07/08/25
**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि.०७/०८/२०२५**
**घोडेगाव**